| सभेचें स्थळ | तारीख | अध्यक्ष | परिणाम | शेरे |
|---|---|---|---|---|
| मुंबई (टाऊन हॉल) | १७-१०-१९०९ | सर सयाजीराव महाराज गायकवाड | दारावर फंड गोळा करण्यांत आला. | मुंबईंतील बऱ्याच प्रमुख व्यक्तींनीं भाग घेतला होता. सर्व्हंटस ऑफ इंडिया, आर्यसमाज थिऑसॉफिकल सोसायटी, सोशल रिफॉर्म वगैरे संस्थांचे प्रतिनिधि हजर होते. |
| दार्जिलिंग | | मि. ए. सी. सेन | | सभा यशस्वी झाली. |
| धुळें | | रा. माधवराव ना. गद्रे, रिटायर्ड पब्लिक प्रॉसिक्यूटर | ठरावः—अस्पृश्यवर्गाची स्थिति सुधारण्याकरितां वर्किंग कमिटी नेमली. | ६०० लोकांच्या जमावापैकीं १५० महार होते. सभा यशस्वी झाली. |
| गदग | १७-१०-१९०९ | रा.सा. विरूपाक्षप्पा मानवी | ठरावः—मिशनला सहानुभूति दर्शवून फंड-गोळा करण्याकरितां स्टँडिंग लोकल कमिटी स्थापिली. | गदग व बेहगिरी गांवांहून पुष्कळ लोक सभेस आले होते. |
| कारवार | १७-९-१९०९ | रा. ब. गांगोली | ठरावः—मिशनच्या कामासाठीं कार्यकारी समिती स्थापिली. | सर्व जातींचे २०० लोक आले होते. |
| मद्रास अँडरसन हॉल | १७-१०-१९०९ | जस्टिस शंकर नायर | | |

| सभेचें स्थळ | तारीख | अध्यक्ष | परिणाम | शेरे |
|---|---|---|---|---|
| मंगळूर | २३-१०-१९०९ | | | कोर्ट हिल पंचम स्कूलचा बक्षीससमारंभ झाला. |
| नाशिक | | मि. ए. एम्. टी. जॅक्सन, कलेक्टर | फंड गोळा करण्यांत येऊन स्थानिक कमिटी स्थापण्यांत आली. | |
| पुणें | १८-१०-१९०९ | मि. र. पु. परांजपे | फंड गोळा केला. | हंपीच्या शंकराचार्यांनीं ३०० रु. दिले ही महत्त्वाची गोष्ट. गांवांतील प्रमुख ब्राह्मण हजर होते. |
| राजकोट | १७-१०-१९०९ | राजकोटचे ठाकोर-साहेब | ठरावः—धेड लोकांकरिता शाळा स्थापिली. ठाकोर-साहेबांनीं २००० रु. ची आणि एस. एन. पंडित यांनी १०० रु. ची देणगी दिली. | ७०० लोक सभेस आले. |
| रत्नागिरी | १८-१०-१९०९ | मि. खारेघाट सेशन्स जज्ज | ठरावः—अस्पृश्यांच्या शिक्षणार्थ वर्गणी गोळा केली. | एम्. आर. तारकुंडे यांनीं सभेप्रीत्यर्थ खटपट केली. |
| सासवड | | रा. गो. कृ. देवधर | ठरावः—(१) डि. सी. कमिशन, सोशल रिफॉर्म असोसिएशन व श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या प्रयत्नाबद्दल सहानुभूति. (२) महार विद्यार्थ्यांच्या शिक्षणार्थ फंड गोळा करणें आणि अस्पृश्यांनीं मृतमांस न खावें याकरितां चुळवळ करणें. (३) अस्पृश्य विद्या- | सासवडच्या आसमंतांतील खेड्यांतून ६०० ते ७५० अस्पृश्य सभेस हजर होते. खुद्द सासवड येथील ५००—६००लोक हजर होते. स्थानिक |

| सभेचें स्थळ | तारीख | अध्यक्ष | परिणाम | शेरे |
|---|---|---|---|---|
| | | | र्थ्यांना सरकारी शाळांतून प्रवेश मिळावा ह्या ठरावाच्या अंमलबजावणीसाठीं कमिटी नेमण्यांत आली. | लोकांनीं १५०० माणसांकरितां भव्य मंडप उभारला होता. तरुणानीं स्वयंसेवकांचें काम करून व्यापारी व अधिकारी वर्गानें मोठ्या सहानुभूतीनें बरेंच साहाय्य केलें. |
| सातारा | | रा. ब. व्ही. एन्. पाठक | ठराव—अस्पृश्यांकरितां रात्रीची शाळा स्थापिली. अस्पृश्योद्धारार्थ सातारा प्रा. समाजानें जें १२ वर्षांपासून काम केलें त्याबद्दल आभिनंदन करण्यांत येऊन तें काम सातारा लिबरल असोसिएशननें हातीं घ्यावें असें ठरलें. | रा. रा. रा. काळे यांनीं सभा घडवून आणली. हे सातारा लिबरल असोसिएशनचे सेक्रेटरी होते. सभेस सर्व जातींचे लोक मोठ्या प्रमाणावर हजर होते. |
| ठाणें | १७-१०-१९०९ | रा. ब. प्रभाकर विठ्ठल गुते स्मॉल कोर्टाचे सेवानिवृत्त जज्ज | मिशनच्या कार्यासाठीं प्रातिनिधिक कमिटी स्थापण्यांत आली. | सभेस ५०० वर लोक जमले होते. स्थानिक कायस्थ प्रभू आणि सोशल रिफॉर्म क्लबचे सदस्यांनीं हार्दिक साहाय्य सभेच्या कामांत केलें. सभाविसर्जनानंतर अस्पृश्यांनीं सभाजनांस पुष्पहार अर्पण केले. |

| फिरती | स्थळें | किती दिवस राहिलों ? | कार्यः— व्याख्यानें, भेटी वगैरे. |
|---|---|---|---|
| वऱ्हाड | अकोला. (१) | एप्रिल ९ ते १४ | (१) थिएटरांत व्याख्यान, (२) जानोजी डिप्रेस्ड क्लास बोर्डिंगमध्यें उपासना, (३) महारवाडा रात्रीच्या शाळेमध्यें अस्पृश्य स्त्रियांकरितां व्याख्यान, (४) महारवाड्यांत कीर्तन. |
| | उमरावती (२) | एप्रिल १५ ते २२ | रा. ब. आर्. एन्. मुधोळकर व जी. एन्. काणे ह्यांनीं मिशनरी सहकार्य करण्याचें अभिवचन दिल्यावर त्यांच्याच विचारानें ह्या भागाला पुन्हां एकवार मुद्दाम भेट द्यावी असें ठरलें. |
| | थूगांव (३) | एप्रिल १६ ते १९ | (१) अस्पृश्यांची मोठी परिषद. ह्या परिषदेस आसमंतातील ८० खेड्यांतून ४००० लोकांचा समुदाय लोटला होता. ही परिषद दोन दिवस चालली. (२) थूगांवच्या प्रा. समाजांत उपासना चालवली. |
| | मुंबई | एप्रिल २३ | परत आलों. |
| | राजकोट (४) | एप्रिल २३ ते मे २५ | (१) कॅनॉट हॉलमध्यें व्याख्यान, (२) रा. जी. एन्. पंडितांच्या घरीं कीर्तन, (३) अस्पृश्य लोक करितां असलेली शाळा तपासली. |

| अध्यक्ष | स्थानिक कमिटी | फंडाची रोख रक्कम | प्रवास-खर्च | शेरे. |
| --- | --- | --- | --- | --- |
| स्थानिक इंग्रजी शाळेचे हेडमास्तर | स्थानिक कमिटीचे मेंबर्सबरोबर चर्चा करून मातृसंस्थेशीं त्यांचा काय संबंध आहे, याचें विवेचन. स्थानिक कमिटीच्या सदस्यांच्या गांठी घेतल्या. | रु. आ.पै २७५-०-० | रु. आ.पै ३६-८-६ | जानोजी फ्री बोर्डिंग हाउसची कार्यक्षमता अधिक चांगल्या रीतीनें सुधारली जावी. स्थानिक लोकांच्या दुर्दमनीय उत्साहामुळें ही शाखा सर्व वऱ्हाडांतील डि. सी. एम्. शाखांची प्रमुख मध्यवर्ती शाखा होण्यास योग्य आहे. मुंबई शाखेनें येथील भजन समाजाकडे अवश्य लक्ष पुरवावें. कारण समाजांतील २० महार सदस्यांचीं सामाजिक व धार्मिक बाबतींत बरींच प्रागतिक स्वरूपाचीं मतें आहेत. |
| | वऱ्हाडमधून फंडाची एकूण— | २७५-०-० | ३६-८-६ | |
| हिज हायनेस दी ठाकोरसाहेब ऑफ राजकोट | स्थानिक कमिटी मिशनशीं संलग्न नसतांही तिच्या सभासदांनीं मि. शिंदे ह्यांस सर्वतोपरी साहाय्य केलें; म्हणून राजकोटला जमलेल्या फंडांतील अर्धी रक्कम शिंद्यांनीं ह्या कमिटीच्या स्थानिक उपयोगाकरितां हवाली केली. | २९९-०-० | | सबंध काठेवाडांत अस्पृश्यांची एक धेड लोकांची कर्नल अल्कॉट फ्री स्कूल या नांवाची संस्था असून तिच्या भरभराटीचें श्रेय राजकोटच्या ठाकोरसाहेबांच्या उदार सहानुभूतीलाच आहे. |

| फिरती | स्थळें | किती दिवस राहिलों ? | कार्यः— व्याख्यानें, भेटी वगैरे. |
|---|---|---|---|
| काठेवाड | गोंडल (५) | एप्रिल २८ ते २९ | (१)प्राशिया कॉलेजांत व्याख्यान,(२)श्रीमंत ठाकोरसाहेब सर भगवंतसिंगजी व त्यांचे चिरंजीव यांशीं मुलाखत. |
| | भावनगर (६) | मे ३ ते ८ | (१) सामळदास कॉलेजमध्यें व्याख्यान, (२) धेड लोकांच्या वस्तीचें निरीक्षण केलें. |
| | मांगरोल (७) | मे १० ते १२ | (१) हंटर स्कूलमध्यें जाहीर व्याख्यान, (२) मांगरोळच्या चीफ-साहेबांशीं मुलाखत, (३) मि० ई० मॅक्नॉच, पोलिटिकल एजंट, यांशीं मुलाखत. (४) धेड लोकांची वस्ती पाहिली. |
| (२) काठेवाड | जुनागड (८) | मे १२ ते १३ | (१) जुनागडचे ॲडमिनिस्ट्रेटर मि० रेंडॉल यांशीं मुलाखत, (२) स्थानिक हायस्कुलांत व्याख्यान. |
| | वादिया (९) | मे १४ | प्राथमिक शाळेंत जाहीर व्याख्यान. |
| | राजकोट | मे १६ | परत आलों. |
| | मुंबई | मे १८ | परतलों. |

| अध्यक्ष | स्थानिक कमिटी | फंडाची रोख रक्कम | प्रवास-खर्च | शेरे. |
|---|---|---|---|---|
| | | रु. आ. पै. | रु. आ. पै. | |
| गोंडल संस्थानचे दिवाण | | | | श्रीमंत ठाकोरसाहेब इंग्लडला जाण्याचे गडबडींत असल्यानें कायम स्वरूपाचें विधायक कार्य होऊं शकलें नाहीं. |
| दिवाणसाहेब प्रभाशंकर पट्टणी | एक नवीन स्थानिक कमिटी स्थापून तिचे अध्यक्ष व सेक्रेटरी अनुक्रमें डॉ. देव आणि एल. बी. वैद्य यांना नेमलें. ह्या कमिटीनें एक नवीन शाळा स्थापण्याचा ठराव केला. ती शाळा अद्याप चालू आहे. | ४०५-०-० | | दिवाण प्रभाशंकर पट्टणी यांनीं हार्दिक सहानुभूति दर्शवून शिंदे यांचा संस्थानच्या वतीनें यथोचित गौरव केला. |
| दिवाणसाहेब बॅ० अलिमहंमद देहलवी | एक नवीन कमिटी स्थापिली. डॉ. रविशंकर अंजारी यांस सन्मान्य सेक्रेटरी करून कमिटीतर्फे एक दिवसाची शाळा उघडली. | २५-०-० | | मांगरोलचे चीफसाहेब हिज हायनेस शेखसाहेब व दिवाण मि० देहेलवी यांनीं मिशनच्या कार्यास योग्य तें साहाय्य देण्याचें अभिवचन दिलें. |
| जुनागडचे डायरेक्टर ऑफ पाब्लिक इन्स्ट्रक्शन मि० तर्खड | स्थानिक कमिटीची स्थापना करून मि० तर्खड यांना चेअरमन व मि. पी.बी. नानावटी यांस सेक्रेटरी करून अस्पृश्यांची शाळा स्थापिली. | ३५०-०-० | | संस्थानचे उत्साही ॲडमिनेस्ट्रेटर मि० रॅंडॉल यांनीं व्यक्तिशः आर्थिक मदत तर दिलीच, पण शिवाय अस्पृश्यांच्या शाळेचा सारा खर्च संस्थानकडून चालविण्याचें वचन दिलें. |
| वादियाचे चीफसाहेब | | | | |
| | | २५०-०-० | | लिमडीच्या महाराजांकडून |
| | काठेवाडांतील | १००-०-० | ५७-१३-६ | पोरबंदरच्या ॲडमिनिस्ट्रेटरकडून |
| | एकूण— | १४२९-०-० | ५७-१३-६ | |

| फिरती | स्थळें | किती दिवस राहिलों | कार्यः—व्याख्यानें, भेटी वगैरे. |
|---|---|---|---|
| (३) कर्नाटक प्रांत | पुणें (१०) | ऑगस्ट १२ ते १४ | (१) जॉन स्मॉल हॉलमध्यें व्याख्यान, (२) डि सी. एम्. स्कूलची पाहाणी, (३) रुपी फंडाबाबत फर्ग्युसन कॉलेज विद्यार्थ्यांशीं चर्चा. |
| | सातारा (११) | ऑगस्ट १५ ते २१ | (१) ऑर्थर हॉलमध्यें जाहीर व्याख्यान, (२) सर्वतोंपरी अस्पृश्यांकडून चालविण्यांत येत असलेल्या सातारा प्रा. समाजांत उपासना, (३) रा. ब. व्ही. एन्. पाठक यांचे घरीं वरिष्ठ वर्गाच्या स्त्रियांची बैठक. |
| | सांगली (१२) | ऑगस्ट २२ ते २५ | (१) हायस्कूलमध्यें व्याख्यान, (२) सांगलीचे राजेसाहेबांशीं मुलाखत, (३) महारवाडा पाहिला. |
| | मिरज (१३) | ऑगस्ट २३ | चीफसाहेबांशीं मुलाखत. |
| | बुधगांव (१४) | ऑगस्ट २४ | (१) चीफसाहेबांशीं मुलाखत, (२) अस्पृश्यांची शाळा पाहिली. |
| | बेळगांव (१५) | ऑगस्ट २७ ते ३१ | (१) म्युनिसिपल ऑफिसांत व्याख्यान, (२) महारवाड्यांत व्याख्यान, (३) अस्पृश्यांची शाळा तपासली. (४) मिशनच्या कार्याबद्दल कळकळ असणाऱ्या कलेक्टरांशीं मुलाखत. |
| | धारवाड (१६) | सप्टेंबर १ ते ५ | (१) सोशल क्लबांत व्याख्यान, (२) दोन खालच्या जातीच्या शाळा तपासल्या. (३) मुलींच्या शाळेंत वरिष्ठवर्गीय स्त्रियांशीं चर्चा, (४) पुरुषांचे व स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेजांस भेटी देऊन प्रिन्सिपॉल व लेडी सुपरिंटेंडेंटशीं अस्पृश्य समाजाबाबत चर्चा, (५) धेडवाड्यांत अस्पृश्यांबरोबर त्यांच्या स्थितीबद्दल चर्चा. |

| अध्यक्ष | स्थानिक कमिटी | फंडाची रोख रक्कम | प्रवास खर्च | शेरे. |
|---|---|---|---|---|
| फर्ग्युसन कॉलेजचे प्रो. लिमये. फर्ग्युसन कॉलेजचे प्रो. के. रा. कानिटकर. | | | | पुणें शाखेच्या सुतारकामाच्या वर्गामध्यें पुष्कळ सुधारणा घडून येत असून तिचें भवितव्य बरेंच उज्ज्वल आहे. |
| डिस्ट्रिक्ट जज्ज | स्थानिक कमिटीची पुनर्घटना करून तिचे चेअरमन रा. रा. काळे यांना केलें. | ५९४-०-० <br> १०-०-० | | स्थानिक भजन समाजाचे महार सदस्य मांग लोकांशीं उघडपणें रोटीव्यवहार करीत असल्याचें आढळलें. असा प्रकार इतरत्र कोठेंच आढळत नाहीं. महार सदस्यांना डि. सी. एम्. च्या कार्याविषयीं सहानुभूतिपर आदर आहे. |
| कलेक्टर | स्थानिक कमिटी स्थापून गोविंद रामचंद्र ओक, बी. ए., एल्एल्. बी. यांस सेक्रेटरी नेमलें. | २१०-०-० | | |
| मि. रोड्डा | नवीन कमिटी स्थापून मि. एन्. आर. देशपांडे, बी. ए., एल्एल्. बी. यांस सेक्रेटरी व मि. रोड्डा यांस चेअरमन नेमलें. | ३४-८-० | | खालच्या जातीच्या शाळेंत मुलींची संख्या मुलांपेक्षां जास्त होती. पण बहुतेक मुली यल्लम्मा देवीच्या जोगातिणी होत्या. ही बातमी डॉ. मॅन यांस कळवली. हे बालसंरक्षण मंडळी या संस्थेचे होते. |

| फिरती | स्थळें | किती दिवस राहिलो ? | कार्यः—व्याख्यानें, भेटी वगैरे. |
|---|---|---|---|
| कर्नाटक प्रांत | हुबळी<br>१७ | सप्टें.<br>५ ते १२ | (१) म्युनिसिपल हॉलमध्यें व्याख्यान, (२) लिंगायत महिलांशीं विचारविनिमय. (३) अंत्यजवर्गाच्या दोन शाळा तपासल्या. (४) स्वामी सिद्धारूढ यांची त्यांच्या मठांत भेट आणि त्यांचे शिष्य शिवानंद यांनीं विद्यार्थी–वसतिगृहासाठीं इमारत बांधली तिची पाहणी. |
| | जमखंडी<br>१८ | सप्टें.<br>१४ ते १५ | (१) हायस्कुलांत व्याख्यान, (२) अंत्यज शाळा पाहिली. (३) श्रीमंतांची भेट. |
| | मुधोळ<br>१९ | सप्टें.<br>१६ ते १७ | (१) वाचनालयांत व्याख्यान, (२) अंत्यज शाळा तपासली. (३) अधिपतींशीं मुलाखत, (४) रा. परांजपे यांच्या घरीं वरिष्ठवर्गीय महिलांची सभा. |
| | तेरदाळ<br>२० | सप्टें.<br>१८ ते २० | (१) बाजारांत व्याख्यान, (२) अंत्यज शाळा तपासली. (३) महारवाड्यास भेट. |
| | मुंबई | सप्टें.<br>२२ | परतलों. |
| | मंगळूर<br>२१ | ऑक्टो.<br>२ ते १० | के. रंगरावची शाळा, उद्योगालय आणि अस्पृश्यांची वसाहत तपासली. |
| | वेंगुर्ला<br>२२ | ऑक्टो.<br>१४ ते १५ | (१) वाचनालयांत व्याख्यान, (२) महारवाड्यांतभेट, (३) अंत्यज शाळांची तपासणी. |

| अध्यक्ष | स्थानिक कमिटी | फंडाची रोख रक्कम | प्रवास-खर्च | शेरे. |
|---|---|---|---|---|
| मि. कुदन, म्युनिसिपल अध्यक्ष | नवीन कमिटी नेमली रा. कृष्णराव आर. वाळवेकर प्रेसिडेंट, मि. वागळे वकील आणि तिम्माप्पा मुदरड्डी, सेक्रेटरी. | ४५७-०-० | | कर्नाटक प्रांतासाठीं एक जोरदार अंगभूत शाखा उघडण्यास हें चांगलें स्थळ आहे. व्यापाराचें मुख्य केंद्र. रेल्वे जंक्शन. अस्पृश्यवर्गीय गिरणी-कामगारांची मोठी संख्या. त्यांपैकीं बरेच शिक्षणाभिमुख. |
| स्टेट कारभारी बापट | | २९-८-० | | ब्राह्मणी संस्थान. श्री. शिंदे यांची जन्मभूमि. |
| हायस्कूलचे हेडमास्तर | नवीन कमिटी स्थापिली. दत्तोपंत मिरजकर, सेक्रेटरी. | | | मराठा संस्थान. गांव मागासलेलें असूनसुद्धां नवीन कार्याची स्थापना. |
| तालुक्याचे मामलेदार | नवीन कमिटी स्थापली. रा. दुर्वास वकील, सेक्रेटरी. | | | श्री. शिंदे ह्यांचे बालमित्र रा. विष्णुपंत देशपांडे मरळीकर. डि. सी. मिशनचे सभासद ह्यांचा गांवांत पुढाकार. |
| | कर्नाटक प्रांतातील | १००-०-० | ७३-८-० | कुरुंदवाड अधिपतींकडून. |
| | एकूण | १४३५-०-० | ७३-८-० | |
| रा. सामंत वकील | स्थानिक कमिटी स्थापिली. रा. आर. व्ही. रांगणेकर, सेक्रेटरी | ५-०-० | | ही संलग्न शाखा होती. अस्पृश्यवसाहत हें कामाचें महत्त्वाचें अंग होतें. |

| फिरती | स्थळें | किती दिवस राहिलों ? | कार्यः—व्याख्यानें, भेटी वगैरे. |
| --- | --- | --- | --- |
| पश्चिम किनारा | सावंतवाडी २३ | ऑक्टो. १५ ते १८ | हायस्कुलांत व्याख्यान, अंत्यजशाळेस भेट. |
| | आंबोली २४ | ऑक्टो. १७ | पोलिटिकल एजंट आणि ॲडमिनिस्ट्रेटर यांशीं मुलाखत. |
| | मालवण २५ | ऑक्टो. १९ ते २२ | (१) भंडारी हायस्कुलांत व्याख्यान, (२) दत्तमंदिरांत व्याख्यान आणि (३) कीर्तन. |
| | रत्नागिरी २६ | ऑक्टो. २३ ते २५ | (१) कलेक्टर क्रेग्न यांशीं मुलाखत, (२) महारवाडा आणि उद्योगशाळा पाहिली. |
| | दापोली २७ | ऑक्टो. २६ ते २८ | (१) काद्री व्हिला एथें व्याख्यान, (२) महारवाड्यांत कीर्तन. |
| | मुंबई | ऑक्टो. २९ | परत आलों. |

| अध्यक्ष | स्थानिक कमिटी | फंडाची रोख रक्कम | प्रवास-खर्च | शेरे. |
|---|---|---|---|---|
| रा. अप्पासाहेब सबनीस हेडमास्तर | | | | अस्पृश्यांच्या औद्योगिक उन्नतीसाठीं एखादी योजना पाठविल्यास पोलिटिकल एजंट मि. ए. एस. पॉटिंजर ह्यांनीं संस्थानी मदतीचें आश्वासन दिलें. |
| | | | | घाटांतील देखावा पाहिला. |
| रा. ब. एम्. एस्. मोरे. | नवीन कमिटी स्थापली. रा. एस्. जी. केणी आणि आर्. डी. पै, सेक्रेटरी. | | | मालवणचा जंजिरा किल्ला आणि त्यांतील शिवाजीचा पुतळा पाहिला. |
| | | ६६-०-० | | उद्योगशाळेंत अस्पृश्यांस प्रवेश नाहीं आणि म्युनिसिपालिटीनें कोणतीही अस्पृश्यासाठीं संस्था आणली नाहीं, ही बाब कलेक्टरच्या नजरेस आणली. विचार करून ताबडतोब लेखी उत्तराचें आश्वासन कलेक्टरानें दिलें. |
| | स्थानिक कमिटीशीं मुलाखत. | | | येथें चांभार लोकांकडून लष्करी पेन्शनरांच्या मुलांसाठीं प्रयत्न होत आहेत. अध्यक्ष कादरीसाहेब हे मुसलमान गृहस्थ आहेत. |
| | | | ३०-१०-३ | |
| पश्चिम किनाऱ्यावरील एकूण | | ७१-०-० | ३०-१०-३ | |
| चारही दौऱ्यांची एकूण | | ३,२१०-०-० | १९८- ८-३ | |